# बाष्पके संचालनालय, कामगार विभाग – https://www.mahaboiler.in

## १०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती निहाय माहिती

| अ. क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो/ ई. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची काल मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टम (BMMS) प्रणाली | पूर्ण | बाष्पक, मितोपयोजके व त्यांचे सुटे भाग निर्मात्यांसाठी बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टम (BMMS) सार्वजनिक-खाजगी भागेदारी तत्वावर (PPP Model ) विकसित करून त्याचे प्रचालन, देखभाल करणे इत्यादि कामे करण्याबाबत शासन आदेश क्र. *बाष्पके -०९२४/प्र.क्र.१५३/काम – १ दिनांक २५.०३.२०२५.* <br><br> संकेतस्थळ: https://www.mahaboiler.in | -- |
| २ | बाष्पक परिचर प्रथम व द्वितीय श्रेणी, बाष्पक प्रचालन अभियंता यांचे प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या डिजिलॉकर मध्ये उपलब्ध करून देणे | पूर्ण | | -- |
| **एकूण** | | **एकूण संख्या – ०२** | **एकूण पूर्ण कामांची संख्या – ०२** | **एकूण अपूर्ण कामांची संख्या – निरंक** |

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कामगार विभाग**

**बाष्पके संचालनालय**

# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

**बाष्पके संचालनालय**

**कामगार भवन, सातवा मजला, वांद्रे – कुर्ला संकुल,**

**वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१**

## नाविन्यपूर्ण उपक्रम १ - सुकर जीवनमान

### अ) सेवांचे सुलभीकरण:

**बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सॉफ्टवेअर (BMMS) चे लोकार्पण :**

या संचालनालयाने नाविन्यपूर्ण उपक्रम, Ease of doing Business तसेच बाष्पक व त्याच्या सुट्या भागाची निर्मिती करणाऱ्या निर्मात्यांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण या हेतूने व शासनाच्या १०० दिवसाच्या कृती आराखड्यांतर्गत, बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टम (BMMS) ही देशातील पहिली बाष्पक व त्याच्या सुट्या भागाच्या निर्मिती दरम्यान निरीक्षण तथा त्यांचे प्रमाणीकरण करणारी प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीचे लोकार्पण दि. २५/०३/२०२५ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टम (BMMS) मुळे बाष्पके संचालनालयाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या खालील सेवांचे सुलभीकरण तथा त्या ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत.

1. Approval of Design and Manufacturing Drawings for Boiler and Boiler components - made in India
2. Approval of Design and Manufacturing Drawings for Boiler and Boiler components - made outside India
3. Issue of Certificate for Manufacture and test - Boiler and Boiler Components.

| | **पारंपरिक ऑफलाइन पद्धत (पूर्वीची)** | **सुधारित ( BMMS ) ऑनलाइन प्रणाली मुळे झालेले बदल** |
|---|---|---|
| **रेखांकन (Drawing) मंजूरी प्रक्रिया** | कागदावर आधारित असून प्रत्यक्ष सादर करावी लागत होती. मंजुरीसाठी वेळखाऊ असून अनेक टप्प्यांतील मान्यतांची आवश्यकता. | पूर्णतः ऑनलाइन पद्धतीने रेखांकन अपलोड करून मंजुरी घेता येते. ही प्रक्रिया पारदर्शक, वेळ बचत करणारी व ट्रॅकेबल आहे |
| **प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया** | कागदपत्र सादरीकरणानंतर, मंजुरी व प्रमाणपत्र देण्यास विलंब. | प्रमाणपत्र ऑनलाइन प्रणालीवरून थेट डाउनलोड करता येते, जलद व सोपी प्रक्रिया. |
| **दस्तऐवज व नोंदींचे व्यवस्थापन** | कागदपत्रांची फाईल स्वरूपातील जपणूक, हरवण्याची शक्यता. | सर्व दस्तऐवज क्लाऊडमध्ये सुरक्षित, कुठेही व केव्हाही वापरता येतील |
| Ease of Doing Business | प्रक्रिया गुंतागुंतीची, वेळखाऊ व संसाधन खर्चिक | सुलभ, पारदर्शक व उद्योगांना प्रोत्साहन देणारी प्रणाली. |
| **उद्योजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण** | राज्यातील विविध जिल्ह्यात असणाऱ्या बाष्पक व त्याच्या सुट्या भागाची निर्मिती करणाऱ्या उद्योजकांना विविध मान्यता, कागदपत्रे तपासणी, प्रमाणीकरण साठी मुंबई मुख्य कार्यालय तसेच प्रादेशिक कार्यालयात प्रवास करावा लागत होता. | प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असल्यामुळे प्रत्यक्ष कार्यालयात येण्याची गरज नाही. |

# नाविन्यपूर्ण उपक्रम २ - कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा


**बाष्पक परिचर तसेच बाष्पक प्रचालन अभियंता यांचे प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या Digilocker मध्ये समाविष्ट करण्यात आले:**

बाष्पक परिचर प्रमाणपत्र परीक्षा तसेच बाष्पक प्रचालन अभियंता नैपुण्य प्रमाणपत्र परीक्षांचे व्यवस्थापन याअगोदर ऑफलाइन पद्धतीने होत होते. आता सदर परीक्षांचे अर्ज करण्यापासून ते प्रमाणपत्र मिळेपर्यंत संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे. यामुळे अर्ज छाननी, पडताळणी, प्रमाणपत्र तयार करणे, इत्यादि प्रक्रिया सुलभ व वेगवान झाल्या आहेत.

याचाच पुढचा भाग म्हणून तसेच शासनाच्या १०० दिवसाच्या कृती आराखड्यांतर्गत सदर प्रमाणपत्रे केंद्र शासनाच्या Digilocker मध्ये घेण्याचा निर्धार या संचालनालयामार्फत करण्यात आला होता. व त्याचे लोकार्पण दि. २५/०३/२०२५ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

***फायदे :***

- प्रमाणपत्रांची पडताळणीची गरज संपल्याने पृष्ठांकणाची गरज राहणार नाही.
- बाष्पक परिचर व बाष्पक प्रचालन अभियंता यांना देशात कुठेही नोकरी करण्याची संधी.
- मोफत सेवा: डिजी लॉकर सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे.
- एकदा डिजीलॉकरमध्ये दस्तऐवज अपलोड केल्यावर ते कायमस्वरूपी सुरक्षित राहतात, त्यामुळे हरवण्याची किंवा नष्ट होण्याची चिंता राहत नाही.
- पेपरलेस प्रक्रिया त्यामुळे पर्यावरण संवर्धनाला हातभार लागतो.



दि. 25 मार्च 2025 रोजी मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते बाष्पके संचालनालय, कामगार विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टम व डिजी लॉकरचे लोकार्पण मुख्यमंत्री कार्यालय, विधान भवन येथे करण्यात आले. हा कार्यक्रम मा. राम शिंदे, सभापति विधान परिषद, मा. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, मा. श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, मा. श्री. आकाश फुंडकर, कामगार मंत्री,मा. श्री. उदय सामंत, मंत्री उद्योग, मा. आशीष शेलार, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री, मा. श्री. आशीष जैसस्वाल, राज्य मंत्री, कामगार, श्रीमती आय. ए. कुंदन (भा. प्र. से.), प्रधान सचिव, कामगार, श्री. दीपक पोकळे, उपसचिव, कामगार, श्री. धवल अंतापूरकर, संचालक, बाष्पके संचालनालय यांच्या उपस्थितीत पार पडला.









## बाष्पके व्यवस्थापन प्रणाली, डिजिलॉकरचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बाष्पके संचालनालय, कामगार विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सिस्टीम आणि डिजिलॉकरचे लोकार्पण विधान भवनातील मुख्यमंत्री कार्यालयात करण्यात आले. या नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे संपूर्ण बाष्पके निर्मितीची प्रक्रिया गतिमान व पारदर्शक होईल तसेच बनावट प्रमाणपत्रांच्या वापरावर आळा बसेल. शिवाय डिजिलॉकरमध्ये बाष्पक प्रचालन अभियंता यांची प्रमाणपत्रे उपलब्ध असतील. या अनावरणाप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कामगार मंत्री आकाश फुंडकर, उद्योग मंत्री उदय सामंत, माहिती-तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार उपस्थित होते.



## बाष्पक निर्मात्यांसाठी व्यासपीठ स्थापन

मुंबई, ता. २६ : कामगार विभागाच्या बाष्पक संचालनालयातर्फे तयार केलेल्या बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनिजमेंट सिस्टीम आणि डिजिलॉकरचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

मॅनिजमेंट सिस्टीमच्या या ऑनलाइन प्रणालीद्वारे बाष्पक निर्मिति आणि बाष्पक सुटे भाग निर्मिति यांच्यासाठी भारतात व्यासपीठ प्रथमच उपलब्ध झाले आहे. सरकारच्या इज ऑफ डूइंग बिजनेस या तत्त्वानुसारच हे पाऊल उचलण्यात आले आहे.

नामांकित बाष्पक निर्मात्यांसोबत ही सर्वसमावेशक प्रणाली तयार करण्यात आली आहे. निर्मितीनंतरची प्रमाणपत्रे ऑनलाइन देता येतील आणि या प्रमाणपत्रांची त्रयस्थ संस्थांमार्फत पडताळणी होऊ शकेल. त्यामुळे बाष्पक निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर ऑनलाइन लक्ष ठेवणे आणि सद्य:स्थिती तपासणे शक्य होईल, असे कामगारमंत्री आकाश फुंडकर या वेळी म्हणाले. कार्यक्रमात बाष्पक परिचर आणि बाष्पक प्रचालन अभियंता यांची प्रमाणपत्रे केंद्र शासनाच्या डिजीलॉकरमध्ये उपलब्ध करण्याच्या प्रणालीचेही लोकार्पण झाले.

मुंबई : कामगार विभागाच्या बाष्पक संचालनालयातर्फे तयार केलेल्या बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनिजमेंट सिस्टीम आणि डिजिलॉकरचे लोकार्पण करण्यात आले.